## फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० प्रमाणे फिर्यादीची पडताळणी

०१. मी श्री. अनिल भास्कर भाईप वय–४२ वर्षे, धंदा–शेती, रा. कास, दाभाळवाडी, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग शपथेवर सत्य कथन करतो की,

०२. आरोपी अभिमन्यू अर्जुन कासकर यांना मी ओळखतो. आरोपी हा कास, मळीवाडी येथे राहतो. मौजे कास येथील श्री देव माऊली व श्री देव रवळनाथ या देवस्थानाचा मी मानकरी आहे. हे देवस्थान खुप जुने असून त्याची नोंद धर्मादाय कार्यालयाकडे करण्यात आलेली आहे. या देवस्थानामध्ये एकुण दोन प्रमुख मानकरी आहेत आणि ते म्हणजे आमचे भाईप कुटुंब आणि पंडीत कुटुंब. भाईप कुटुंबाकडे १/३ हिश्श्याचे मानपान असून पंडीत कुटुंबाकडे २/३ हिश्श्याचे मानपान आहे. या मानपानाबाबत दिवाणी न्यायालय, सावंतवाडी येथे सन १८७१ मध्ये निर्णय झालेला आहे. त्यानंतर सन १९७४ मध्ये भाईप कुटुंब व पंडीत कुटुंब यांच्यामध्ये या मानपानाबाबत दुय्यम निबंधक सावंतवाडी यांचेकडे नोंदणीकृत करार देखील झालेला आहे. हा करार भाईप कुटुंबाच्या वतीने माझे सख्खे आजोबा नारायण सिताराम भाईप यांनी लिहून दिलेला आहे. दिवाणी न्यायालय सावंतवाडी यांच्या निर्णयानुसार सन १८७१ पासून तसेच या करारापासून या दोन्ही देवस्थानातील भाईप आणि पंडीत कुटुंबांचे मानपान सुरु आहेत.

०३. अलिकडे उपविभागीय अधिकारी यांचे समोर अपील क्र. १/२०२१ हे अपील या दोन्ही देवस्थानाबाबत आमच्या भाईप कुटुंबियांनी पंडीत कुटुंबियांविरुध्द दाखल केलेले आहे. आरोपीने तहसिलदार सावंतवाडी यांचेसमोर त्याचे शपथपत्र करुन हे शपथपत्र या अपिलाच्या कार्यवाहीमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेसमोर दाखल केलेले आहे. या शपथपत्रामध्ये आरोपीने भाईप कुटुंबिय हे कास या गांवचे नाहीत आणि या देवस्थानचे ते आश्रीत आहेत वगैरे माझी व माझ्या कुटुंबाची बदनामी करणारा खोटा मजकूर नमुद केलेला आहे. त्यानंतर मी माझे वकील ॲड. श्री. केसरकर यांच्यामार्फत आरोपीला नोटीस पाठवून या शपथपत्राबाबत आमची माफी मागावी किंवा खुलासा करावा असे कळविले होते, परंतु आरोपीने या नोटीसला काहीच प्रतिसाद दिला नाही. आरोपीने दाखल केलेल्या या शपथपत्रातील 'आश्रीत' या मजकूरामुळे तसेच इतर मजकुरामुळे माझी व माझ्या कुटुंबियांची कास या

गांवामध्ये तसेच आजुबाजूच्या गांवामध्ये बदनामी व मानहानी झालेली आहे. मी माझ्या फिर्यादच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेसमोरील अपील क्र. ०१/२०२१ मधील अपीलाची सत्यप्रत, आरोपीने दाखल केलेल्या शपथपत्राची छायांकित प्रत, मी आरोपीला पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत, करारपत्राची छायांकित प्रत तसेच इतर कागदपत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे आरोपीला कायदयाप्रमाणे शिक्षा होणेबाबत माझी विनंती आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत
सही/-
(श्रीमती आर.आर.बेडगकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.

दि. २७/०९/२०२१

(फिर्यादीची सही)